# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/03/2023 (गुरूवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील हेडगेवार नगर धापेवाडा येथे दिनांक १४/०३/२०२३ चे १६.३० वा. ते १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अर्शिल अयुब शेख, वय २१ वर्ष, रा. हेडगेवार नगर बॅक ऑफ इंडिया चे मागे धापेवाडा ता. कळमेश्वर व त्याचे वडील हे बाजार चौक धापेवाडा येथे त्यांच्या किराणा दुकाणात गेले होते व फिर्यादीची आई ही आठवडी बाजार असल्याने भाजीपाला घेण्या करीता घराला कुलुप लावुन बाजारात गेली असता कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीच्या घराच्या दरवाज्याची कुंडी तोडुन आत प्रवेश करुन घरातील बेडरुममध्ये ठेवलेले लाकडी कपाटामधील १) सोन्याचे एक जुने मंगळसुत्र वजन १० ग्रॅम किंमती अंदाजे १५,०००/–रु २) सोन्याचे एक जुने लहान मंगळसुत्र वजन ५ ग्रॅम किंमती अंदाजे ७,५००/– रु. ३) सोन्याचा एक जुन्या बांगडया वजन ५ ग्रॅम किंमती अंदाजे ७,५००/– रु. ४) सोन्याची एक जुनी पांचाली वजन ४ ग्रॅम किंमती अंदाजे ६००० रु ५) सोन्याचे जुने कानातील टॉप्स वजन ४ ग्रॅम किंमती अंदाजे ६००० रु ६) नगदी १०,००० रु असा एकुण ५२,०००/– रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि फुलेकर मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. उमरेड :–** अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील बायपास चौकातील गिरड बस स्टॅड उमरेड येथे दिनांक १४/०३/२०२३ चे १७.०० वा. ते १७.३० वा सुमारास फिर्यादी नामे– सौ, माधुरी विनोद पोहणकर, वय ४२ वर्ष रा. नांद भिवापूर हीची मुलगी नामे– मुस्कान पोहनकर हिचे सोबत मौजा नांद येथुन एस. टी बस ने पो.स्टे. उमरेड येथे आली व उमरेड वरून नांद येथे जाण्यासाठी उमरेड बायपास चौकातील गिरड बस स्टॅड येथे दुपारी ०४.०० वा थांबली होती तेव्हा गळयात सोन्याची काळी पोत होती दुपारी ०५.०० वा. उमरेड आगाराची उमरेड खोलदोडा नांद मार्गे बस आल्याने फिर्यादी व मुलगी बसमध्ये चढले सिटवर बसले असता बेसूर गावाजवळ गळयातील जुनी वापरती सोन्याची काळी पोत किंमती अंदाजे, ४०,०००/–रू ही दिसली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा आनंद धात्रक मो. नं. ९५४५३५५४७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**